**आजचा सुविचार**

वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर
साथ देवो न देवो,
परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध
कायम आयुष्यभर साथ देतात.

दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २१०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# अमरावती देशातील सर्वाधिक उष्ण शहर, विदर्भात आगामी काळात वादळी पावसाचा अंदाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** राज्यात जवळपास सर्वच शहरांमध्ये तापमानाचा पारा चढलेला बघायला मिळतोय. अनेक शहरांमध्ये उन्हामुळे सर्वसामान्यांची लाही-लाही होताना दिसत आहे. मुंबई, ठाणे, पालघर, जळगाव, धुळे, नंदूरबार यांसह अनेक जिल्ह्यांमध्ये प्रचंड कडाक्याचं ऊन पडताना दिसत आहे. हीच परिस्थिती विदर्भात देखील आहे. विशेष म्हणजे अमरावती हे देशातील सर्वात उष्ण शहर असल्याची नोंद झाली आहे.

त्यामुळे मार्च महिन्यातच उन्हाच्या तीव्र झळा बघायला मिळत आहे. मार्च महिन्यातच अशी अवस्था असेल तर एप्रिल आणि मे महिन्यात किती ऊन पडेल? असा प्रश्न सर्वसामान्यांना सतावत आहे. या दरम्यान हवामान विभागाने आगामी काळात विदर्भात वादळी पावसाचा देखील अंदाज वर्तवला आहे.

यंदा मार्च महिन्यातच विदर्भाला उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागतो आहे. गुरूवारी (१२ मार्च) अमरावती येथे ४२.२ अंश तर अकोला येथे ४२ अंश तापमानाची नोंद करण्यात आली. अमरावती हे गुरुवारी देशातील सर्वाधिक तर जगभरातील १५ व्या क्रमांकाचे उष्ण शहर ठरले. यातील अमरावती आणि अकोला या दोन्ही शहरांमध्ये सरासरीपेक्षा अनुक्रमे ६.८ आणि ५.३ अंशांनी अधिक तापमान नोंदविले गेले असल्याने येथे उष्णतेची लाट असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.



विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही तापमानात मोठी वाढ झाली आहे. यात ब्रह्मपुरी येथे ४०.८, चंद्रपूर आणि वर्धा येथे प्रत्येकी ४०.२ अंश तर यवतमाळ येथे ४० इतके तापमान होते. त्यामुळे विदर्भातील ११ पैकी निम्म्याहून अधिक जिल्ह्यांत तापमान ४० अंशांपेक्षा अधिक होते. याखेरीज नागपूरमध्ये ३९ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. बहुतांश ठिकाणी तापमान सरासरीपेक्षा ३ ते ५ अंशांनी अधिक असल्याने उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. भंडारा आणि गोंदिया येथे तुलनेने सगळ्यात कमी प्रत्येकी ३८ इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. फेब्रुवारीअखेर झालेल्या अवकाळी पावसानंतर काही दिवस गारवा होता; मात्र मार्च सुरू होताच वातावरण कोरडे झाले आहे.

**विदर्भात वादळी पावसाची शक्यता**

यानंतर आता हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस विदर्भात वादळी पावसाची शक्यता आहे. यात शुक्रवारी चंद्रपूर आणि यवतमाळ येथे तर शनिवार ते सोमवार या काळात विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाची हजेरी लागण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यात नागपूरचाही समावेश आहे. त्यामुळे पुढील चार दिवसांत विदर्भातील तापमानात घसरण होण्याची शक्यता आहे.

# नाशिक - संभाजीनगर महामार्गावर मृत्यूचे तांडव!

## भरवस फाटा परिसरातील घटना; दोन दिवसांतील तिसरा बळी गेल्याने संताप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील भरवस फाट्याजवळ बुधवारी दुपारी भीषण अपघात झाला. पाठीमागून येणाऱ्या एका अवजड वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ३० वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे पती गंभीर जखमी झाले आहेत. या महामार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे हा रस्ता आता 'मृत्यूचा सापळा' बनला आहे.

**नेमकी घटना काय?**

बुधवारी (दि.११ मार्च) दुपारी १:३८ वाजेच्या सुमारास किरण अंबादास चौधरी आणि सोनाली किरण चौधरी हे



दांपत्य आपल्या पॅशन प्रो दुचाकीवरून (चक १५, १८२६) विंचूरच्या दिशेने जात होते. भरवस फाटा परिसरातील जीवो पेट्रोल पंपासमोर आले असता, पाठीमागून वेगाने येणाऱ्या अवजड वाहनाने (चक१५, क्क९९३२) त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

या धडकेत सोनाली चौधरी (३०) या रस्त्यावर फेकल्या गेल्या. त्यांच्या डोक्याला आणि मेंदूला गंभीर इजा झाल्याने त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. किरण चौधरी हे देखील या अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**नागरिकांचा संताप आणि वाहतूक कोंडी...**

घटनेची माहिती मिळताच लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली. अपघातामुळे संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती, ज्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. दोषी वाहनचालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**महामार्ग बनतोय जीवघेणा !**

विशेष म्हणजे, याच मार्गावर अवघ्या दोन दिवसांपूर्वी जळगाव नेऊर (ता. येवला) येथील तुषार विलास घुले (२८) आणि आकाश बाळूबा सोनवणे (२६) या दोन मित्रांचाही अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला होता. लागोपाठ होणाऱ्या या जीवघेण्या अपघातांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# एसटी महामंडळात विविध पदांची मेगा भरती !

## ३० हजार पगाराच्या तब्बल १७ हजार ४५० जागा भरल्या जाणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, ठाणे :** महाराष्ट्र एसटी महामंडळात तब्बल १७,४५० पदांसाठी मोठी भरती होणार आहे. चालक आणि सहाय्यक पदे कंत्राटी पद्धतीवर भरली जाणार असून किमान पगार देखील ३० हजार रुपये असणार आहे. चालक आणि सहाय्यक पदांसाठी कंत्राटी पद्धतीवर ही भरती असल्याचे महा मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा चेहरामोहरा बोलण्यासाठी सरकारने आटोकाट प्रयत्न सुरू केले असून प्रवाशांच्या वाढत्या संख्येला आणि नवीन बसेसला सामाऊन घेण्यासाठी लाल परीच्या प्रशासनाने तब्बल १७४५० विविध पदांची मेगा भरतीचा प्रस्ताव तयार केला आहे.हा प्रस्ताव सध्या वित्त विभागाकडे पाठविण्यात आला असून त्याला हिरवा कंदील मिळताच ही भरती प्रक्रिया वेगाने सुरू होणार आहे. साधारणता दिवाळीपूर्वी निविदा प्रक्रिया सुरू होणार असल्याची अधिकृत माहिती मिळाली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे तोट्यात असलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आता पुन्हा एकदा कात टाकत असल्याचे दिसत आहे. एसटी महामंडळाने कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी आणि सेवा




अधिक सुरळीत करण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच महामंडळात तब्बल १७ हजार ४५० पदांची मोठी भरती केली जाणार आहे. या निर्णयामुळे एसटीमध्ये नोकरी करण्याची इच्छा असलेल्या हजारो तरुणांसाठी एक मोठी संधी निर्माण झाली आहे.

महामंडळात सध्या चालक आणि वाहकांची मोठी कम तरता आहे. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार पडत आहे. याच पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. महामंडळात कंत्राटी चालक आणि सहाय्यकांची भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ही भरती एकूण १७ हजार ४५० पदांसाठी असेल. यासाठीची निविदा प्रक्रिया येत्या २ ऑक्टोबर रोजी सुरू होणार आहे.

दरम्यान एसटी महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, या भरती प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांना सुरुवातीपासून किमान ३० हजार रुपये इतके वेतन मिळणार आहे. म्हणजेच, हा पगार ३० हजार रुपयांपेक्षा अधिकच असेल. या आकर्षक पगाराच्या संधीमुळे तरुणांमध्ये या नोकरी बद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या मोठ्या भरतीमुळे एसटीच्या सेवेत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. तसेच, कार्यरत कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होऊन ते अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतील. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तरुणांना ही संधी गमावू नये असे आवाहन केले आहे. या भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे तयार ठेवावीत आणि इतर बाबींची पूर्तता करण्यासाठी तयार राहावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती खालावली होती, पण आता ही मोठी भरती जाहीर झाल्याने महामंडळाला पुन्हा नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांतून ही भरती प्रक्रिया राबवली जाईल, ज्यामुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातील तरुणांना सरकारी नोकरीची संधी मिळेल.

# एलपीजी आणि इंधनाबाबत घाबरण्याची गरज नाही! बुकिंगच्या अडीच दिवसात सिलेंडर मिळणार

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.१२, ठाणे :** मध्य-पूर्वेतील वाढता तणाव आणि जागतिक अनिश्चिततेमुळे देशात एलपीजी आणि कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये चिंतेचं वातावरण आहे. मात्र, सरकारनं स्पष्ट केलंय की भारताचा ऊर्जा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असून घाबरण्याची कोणतीही गरज नाही. देशात तेल आणि गॅसचा पुरवठा सातत्यानं सुरू असून परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव (मार्केटिंग आणि ऑईल रिफायनरी) सुजाता शर्मा यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत यासंदर्भातील माहिती दिली. भारत आपली कच्च्या तेलाची गरज सुमारे ४० वेगवेगळ्या देशांकडून आयात करून पूर्ण करतो. यामुळे पुरवठ्यासाठी भारत केवळ एका क्षेत्रावर अवलंबून नाही, असं त्यांनी नमूद केलं.

एलपीजी सिलेंडरच्या टंचाईबाबत स्पष्टीकरण देताना सुजाता शर्मा म्हणाल्या की, नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नाही. सिलेंडर बुकिंगनंतर सुमारे अडीच दिवसांच्या आत डिलिव्हरी सुनिश्चित केली जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, जगासाठी हा आव्हानात्मक काळ असला तरी, भारतातील ऊर्जा पुरवठ्याची स्थिती सध्या स्थिर आणि नियंत्रणात आहे.

# मुंबईप्रमाणे आता ठाण्यातही डबल डेकर बस धावणार


**अक्षराज : संजय पंडित**




**दि.१२, ठाणे :** ठाणे शहरातील सार्वजनिक वाहतुकीत मोठा बदल घडणार असून, आता दिल्ली आणि मुंबईनंतर ठाण्यातही इलेक्ट्रिक डबल डेकर बस धावणार आहेत. या नव्या उपक्रमामुळे ठाणेकरांच्या प्रवासाला अधिक आरामदायी आणि पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होणार आहे. येत्या दिवाळीपूर्वी सुमारे १०० साध्या इलेक्ट्रिक बसेस ठाणेकरांच्या सेवेत दाखल होणार आहेत. या बसेस सुरू झाल्यानंतर शहरातील प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मिळणार आहे. इलेक्ट्रिक बसेसच्या माध्यमातून प्रदूषण कमी करण्यासही मदत होणार असून, प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि आराम दायी करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे ठाणेकरांचे आरामदायी प्रवासाचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरते आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील खतांचा साठेबाजी, काळाबाजार बंद करावा : आ.दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.१२, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि पीक व्यवस्थापनासाठी वापरली जाणारी आवश्यक साधने, सामग्री आणि संसाधने रास्त दरात उपलब्ध व्हावीत ज्यामध्ये प्रामुख्याने सुधारित बियाणे, खते, कीटकनाशके, सिंचन सुविधा, कृषी यंत्रे (ट्रॅक्टर, अवजारे) आणि ऊर्जा (वीज/डिझेल) यांचा समावेश होतो, एकंदरीतच ज्यांच्यामुळे शेतीची उत्पादकता वाढवण्यास मदत होते त्यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. खत विक्रीत होत असलेल्या अनियमितता आणि लिंकींगच्या प्रकारांमुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासाबाबत त्यांनी सभागृहात ठाम भूमिका मांडली.

आमदार दाते यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि पीक व्यवस्थापनासाठी वापरली जाणारी आवश्यक साधने, सामग्री आणि संसाधने विक्रीत अनियमितता आढळल्याने काही कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली असल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच शेतकऱ्यांना रब्बी हंगामात खतांचा पुरवठा वेळेत आणि योग्य दरात मिळावा यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत, असा सवाल त्यांनी केला.

या प्रश्नावर उत्तर देताना कृषी विभागाच्या वतीने मंत्री दत्तामामा भरणे यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या वर्षासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २ लाख ६६ हजार मेट्रिक टन खतांचा कोटा मंजूर करण्यात आला असून मागणीनुसार खतांचा पुरवठा करण्यात येत आहे. जिल्ह्यात खतांचा नियमित पुरवठा राहावा यासाठी प्रशासनाकडून सातत्याने देखरेख केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या सुमारे ३२८८ खत परवानाधारक विक्रेते कार्यरत असून तालुकास्तरीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक तसेच भरारी पथकांमार्फत विक्रेते आणि उत्पादकांची नियमित तपासणी केली जात आहे. जानेवारी अखेरपर्यंत झालेल्या तपासणीत अनियमितता आढळून आलेल्या २४ कृषी सेवा केंद्रांवर खत नियंत्रण आदेश १९८५ चे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करत त्यांचे परवाने निलंबित करण्यात आल्याची माहितीही मंत्री महोदयांनी दिली.

खतांचे लिंकींग होऊ नये यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विक्रेते व कंपनी प्रतिनिधींच्या बैठका घेऊन स्पष्ट सूचना दिल्या असून प्रत्येक कृषी सेवा केंद्रावर खतांचा उपलब्ध साठा आणि दर याबाबत माहिती फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

अक्षराज



# माणूस : एक प्राणी ?



माणूस हा प्राणी आहे, हे वैज्ञानिक सत्य आहे. दररोजच्या जीवनात त्याचे बोलणे, वागणे आणि राहणे पाहिले तर त्याचे प्राणीत्व स्पष्टपणे दिसून येते. खरं तर एखाद्या माणसाचे व्यक्तिमत्त्व जाणून घेणे ही अत्यंत गुंतागुंतीची बाब आहे. एखाद्याशी एखादा व्यक्ती प्रामाणिकपणे वागत असेल, तर तोच व्यक्ती दुसऱ्या कोणाचा विश्वासघात करून अप्रामाणिकही ठरतो.

कधी एखादा माणूस एक महिन्यापूर्वी मी पूर्णपणे नास्तिक आहे; नशीब, दैवी चमत्कार, स्वर्ग-नरक या गोष्टी मानत नाही, असे ठामपणे सांगत असतो. परंतु त्याच्यावर संकट आल्यावर तोच व्यक्ती देवाच्या मंदिरात गाभाऱ्याभोवती फेऱ्या मारताना दिसतो. कधी एखादा माणूस आपले वजन वाढले म्हणून काही महिने आहारावर नियंत्रण ठेवतो; पण अचानक काय होते कोणास ठाऊक, त्याचे नियंत्रण सुटते आणि तो पूर्वीपेक्षा अधिक खाऊ लागतो. अति मद्यपान करणाऱ्या व्यक्तीला डॉक्टर इशारा देतात की, यापुढे जर तू दारू पिलीस, तर तुझ्या वाचण्याची शक्यता नाही. तरीही तो काही दिवस स्वतः वर नियंत्रण ठेवतो आणि पुन्हा दारू पिण्यास सुरुवात करतो.

माणूस आणि त्याचे मन किंवा आत्मा हे दोन्ही भिन्न आहेत का एकच आहेत, याबाबत अनेक तत्त्वज्ञांमध्ये मतभेद आहेत. शरीरधर्मानुसार किंवा शरीराच्या गरजेनुसार माणूस वागू लागला, तर तो प्राण्यासारखा ठरतो. म्हणूनच एका तत्त्वज्ञाने म्हटले आहे

मी माझ्या मनाने देवाच्या कायद्याचा दास आहे; पण माझ्या पापी शरीरामुळे पापाच्या कायद्याचा गुलाम बनतो.

आपण कुत्र्याला लालची समजतो. एखादा माणूसही तसाच हावरटपणा करू लागला, तर त्याच्या वागण्याला 'श्वानवृत्ती' असे म्हटले जाते. पैसा, अन्न आणि इतर आकर्षक गोष्टींसाठी अतिशय लोभ करणारा माणूस श्वानासारखा वागत असल्याचे म्हटले जाते. लबाडपणा हा दुर्गुण लांडग्याच्या गळ्यात टाकला गेला आहे. प्रत्यक्षात लांडग्याने कधी कोणाची फसवणूक केली असे ऐकायला मिळत नाही; तरीही हा दुर्गुण त्याच्या नावाशी जोडला गेला आहे. त्याचप्रमाणे कोल्ह्याच्या कपाळावर धूर्तपणाची उपाधी दिली गेली आहे.

वाघ आणि सिंह हे धाडसी आणि हिंस्र प्राणी मानले जातात. ते शिकार करतात, कारण अन्नसाखळीत त्यांचे स्थान वरचे आहे. ते हिंस्र असतात, पण ते स्वतःच्या पोषणासाठीच तसे वागतात. दुसऱ्यांना धाक दाखवणारे लोक जर स्वतःला 'वाघ' समजू लागले, तर ते एक धोकादायक प्रतीक ठरते.

गाढव हा प्राणी सर्वांत जास्त बदनाम झाला आहे. गाढवपणा करू नको असे म्हणताना आपण मूर्खपणा करू नको, असे सांगत असतो. गाढवाला गुळाची चव काय? किंवा अडला नारायण, धरी गाढवाचे पाय अशा म्हणींमधून कष्टाळू आणि निरुपद्रवी प्राण्याची प्रतिमा अन्यायाने मलिन केली गेली आहे. खरंच माणसात गाढवपणा असतो का?हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

माकडालाही तसेच बदनाम केले गेले आहे. माकड त्याच्या चपळ स्वभावामुळे सतत हालचाल करत असते. त्याच्या उड्या पाहून आपल्याला कुतूहल वाटते; पण माकडचाळे करू नको ही प्रतिक्रिया एखाद्याला टोचू शकते. माकडछाप ही तर अपमानास्पद शिवीच ठरते. माणसाला 'माकड' म्हणणे कितपत योग्य आहे, हे आपणच ठरवले पाहिजे. घुबडाच्या कुरूपतेची तुलना माणसाच्या कुरूपतेशी करणे हेही निर्दयीपणाचे लक्षण आहे. तरीही काहीजण एखाद्याला 'घुबड' म्हणून हिणवतात.

बैल हा अत्यंत कष्टाळू प्राणी आहे. शेतीच्या कामात त्याने केलेल्या परिश्रमांमुळे माणसाच्या अनेक पिढ्या पोसल्या गेल्या; तरीही एखाद्या माणसाने शांतपणे काम केले, तर त्याला 'बैल' म्हणण्याची प्रवृत्ती दिसते. ती कितपत योग्य आहे ? बायकोचं म्हणणं ऐकणाऱ्या नवरोबाला बैल म्हणणं,हे तर सामंजसपणे संसार करणाऱ्या दांपत्याच्या सुखी संसारात मिठाचा खडा टाकण्याचे काम होय.

पूर्वी युद्धानंतर एखादे साम्राज्य शरण आले, तर शांततेचा संदेश देण्यासाठी कबुतरे सोडली जात असत. त्यामुळे आजही कबूतर हे शांततेचे प्रतीक मानले जाते. माणसाच्या चालण्या-बोलण्यालाही प्राणी-पक्ष्यांच्या उपमा दिल्या गेल्या आहेत. एखाद्या स्त्रीच्या मोहक चालण्याला 'नागिणीची चाल' म्हटले जाते. सुंदर डोळ्यांना 'मृगनयनी' अशी उपमा दिली जाते. गोड आवाज असेल, तर तिला 'कोकिळेचा स्वर' म्हटले जाते. स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन करताना हत्ती, हंस, चकोर, पोपट, मोर अशा अनेक प्राणी-पक्ष्यांचा उपयोग केला जातो.

या सर्व उपमा आणि तुलना पाहिल्या तर असे जाणवते की माणूस स्वतःला समजून घेण्यासाठी निसर्गातील इतर प्राण्यांचा आधार घेत असतो. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजेमाणूस केवळ शरीराने प्राणी असला, तरी त्याच्याकडे विचार करण्याची, विवेक वापरण्याची आणि नैतिकता जपण्याची क्षमता आहे.म्हणूनच माणसात पशुत्व असले, तरी त्याच्यात मानवतेचे तेजही आहे. खरा प्रश्न असा आहे की, माणूस आपल्या जीवनात कोणत्या बाजूला अधिक स्थान देतोपशुत्वाला की मानवतेला?

**– किशोर जाधव, सोलापूर**

# युद्धाचा आगडोंब, सर्वसामान्य गॅस..वर..!!

बँक एटीएमबाहेर रांगा. बँकेत नोटा काढण्यासाठी रांगा. तरुण, महिला, वृद्ध असे सर्व रांगेत लागलेले. तिथेच नाश्ता, जेवण आणि काहींना मरणही आले. नोटबंदीचा २०१६ चा तो काळ अजून तुम्ही विसरला नसाल. आता अमेरिका-इस्त्रायल यांनी इराणसोबत सुरू केलेल्या युद्धाचा आगडोंब उसळला. त्याच्या झळा आपल्या दारापर्यंत पोहोचू पोहोचू लागल्या आहेत. एलपीजी गॅस सिलिंडर आणि सीएनजीचा तुटवडा भारतात जाणवू लागला आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा पडल्यामुळे लोकांवर रांगा लावण्याची वेळ आली आहे. तब्बल दहा वर्षानंतर भारतीय नागरिक पुन्हा रांगेत उभा राहत आहे. घरात गॅस सिलिंडर नाही, काही शहरांमध्ये हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पुढील दोन दिवस पुरेल एवढाच गॅसचा साठा आहे. त्यामुळे लोकप लोक फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशभरात गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहत आहेत. दर वाढले तरीही सिलिंडर मिळत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अजून पेट्रोलची मारामार सुरू झाली नाही, हीच त्यातल्या त्यात समाधानकारक बाब. अवघ्या ११ दिवसांच्या मध्यपूर्वेतील तणावामुळे आपल्या आत्मनिर्भरतेचा आत्मा गॅससारखा उडाला. भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा एवढ्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाला की केंद्र सरकारला जीवनावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (एस्मा) लागू करावा लागला आहे. यामुळे कोणीही एलपीजी गॅस सिलिंडर, पेट्रोल, पेट्रोलियम पदार्थांचा साठा करू नये, त्याचा काळाबाजार होऊ नये, यासाठी सरकारला हा कायदा लागू करावा लागला आहे.

पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी यांना भाजपचे पोस्टर बॉय खासदार तेजस्वी सूर सूर्या यांना गॅस पुरवठ्यासाठी पत्र लिहावे लागले आहे. सरकारची प्राथमिकता ही घरगुती गॅस सिलिंडरला आहे. त्यामुळे व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरवर अवलंबून असलेल्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः हॉटेल मालकांना, त्यांना थोडा धीर धरण्याचा सल्ला भाजपचे मंत्री आणि खासदार देत आहेत. भारतीय हे सहनशील आहेत, त्यामुळे ते आणखी काही काळ कळ सहन करतील. तसेही पंतप्रधान मोदींनी नोटबंदीमध्ये 'मला फक्त ५० दिवस द्या', असे म्हणत भारतीयांच्या सहनशक्तीची परीक्षा घेतली आणि त्यात भारतीय नागरिक पासदेखील




झाले. पण त्यासाठी त्यांना किंमत मोजावी लागली. काहीजण रांगांमध्ये घेरी येऊन पडले. काहींचे हृदयविकाराने मृत्यू झाले. अमेरिका-इस्त्रायल या दोन्ही देशांनी मिळून इराणवर हल्ला चढवला. त्याला इराणही तेवढ्याच ताकदीने नसेल पण आपल्या पूर्णक्षमतेने आणि हिमतीने प्रतिकार करत आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रासोबत लढताना इराणने आपली ताकद एकवटून अधिक कडवट प्रतिकार सुरू केला. त्याचाच भाग म्हणजे इराण आणि ओमान यांच्यादरम्यान असलेली होर्मुझ सामुद्रधुनी हा आखातातील तेलाचा जलमार्ग इराणने बंद करून आशियाई देशांचा गळाच दाबला आहे. सौदी अरेबिया, इराक, यूएई, कुवेत, कतार यांसारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांचा बहुतेक सर्व माल, क्रूड ऑईल होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया यासह अनेक देशांना जातो. तो मार्गच बंद पाडल्यामुळे भारतात क्रूड ऑईल-कच्च्या तेलाची आयात कमी झाली, परिणामी एलपीजी आणि नैसर्गिक गॅसचा पुरवठा थांबला आहे. भारतातील मंत्री, राज्यकर्ते जेव्हा-जेव्हा सर्वकाही आटोक्यात आहे, सुरळीत आहे, असे म्हणतात तेव्हा समजून जायचे असते की परिस्थिती त्यांच्या हाताबाहेर गेली आहे. याचा अनुभव भारताने कोविड-१९ काळात घेतला. ते सर्व चीनमध्ये सुरू आहे, परदेशात होत आहे. त्याचा आपल्यावर काही परिणाम होणार नाही, अशी शेखी तेव्हाही मिरवली गेली आणि अचानक देशाला लॉकडाऊनमध्ये ढकलले गेले.




संसदेमध्ये विरोधकांनी मध्यपूर्वेतील परिस्थितीवर चर्चेची मागणी केली, मात्र सरकारकडून ती फेटाळण्यात आली. भारत शांततेच्या बाजूने आहे, असे सांगत एस. जयशंकर यांनी सामान्य नागरिक जे रोज बातम्यांमध्ये पाहतो, ऐकतो आणि वाचतो तेच त्यांनी देशाच्या सर्वोच्च सभागृहात सांगितले. सरकार सभागृहात चर्चा करायला तयार नाही. देशाचे परराष्ट्र धोरण काय आहे, हे सांगायला तयार नाही. पंतप्रधान युद्ध सुरू होण्याच्या दोन दिवस आधी इस्त्रायलला जाऊन आले. इराणचे लढाऊ जहाज आपल्या देशात आले होते. राष्ट्रपतींना त्यांनी सलामी दिली. त्यातील एका जहाजाला मायदेशी परतताना अमेरिकेने जलसमाधी दिली. त्यानंतरही आपल्याकडून शोक ना संदेश पाहाय पाहायला मिळाला. त्या युद्धनौकेबद्दल बोलायला परराष्ट्रमंत्री तयार नाहीत. भारताला रशियाकडून तेल खरेदीची परवानगी अमेरिका देते, भारताच्या सार्वभौमत्त्वाचे काय झाले, हा प्रश्न थोडावेळ बाजूला ठेवला तरी, रशियाकडून भारताने पेट्रोलियम पदार्थांची खरेदी केली की नाही, केली असेल तर भारतात इंधनाचा, गॅसचा प्रश्न का निर्माण झाला, हे कोणी सांगत नाही. गॅस तुटवड्यावर पेट्रोलियममंत्री समोर येऊन बोलायला तयार नाहीत. देशात किती तेल, गॅस साठा आहे, किती दिवस पुरेल सर्वकाही गुलदस्त्यात आहे. त्यामुळे सामान्य माणसाचे प्राक्तन हे फक्त रांगेत उभे राहणे. जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असल्याचा दावा करणारे, भारताला विश्वगुरूपद मिळवून देण्याची आशा दाखवणारे सगळेच आखाती युद्धामुळे गॅसवर गेले आहेत. मेक इन इंडियाचे दावे किती दुबळे आहेत, हे दिसत आहेत. हे थेट युद्ध आपल्याशी नसले तरी आपण बेजार झालो आहोत. या युद्धाचे भविष्य काय ते दिसेलच, पण एक देश म्हणून आपण किती परावलंबी आहोत, हे या युद्धाने दाखवून दिले आहे. आत्मनिर्भरतेचा फुगा फुटला आहे. यातून आपला भ्रम दूर व्हावा आणि आपल्या सरकारने देशाची स्थिती अधिक मजबूत करण्यावर भर द्यावा ही अपेक्षा.

## युध्द उद्देश

महा सत्ताक युध्दात
होरफळे अनेक देश
किं कारण उमजे ना
का पराकोटीचा द्वेष

महा युध्दा निरूपाय
काय आंतरिकउद्देश
हिटलर हे झपाटलेले
कोण देतो हा आदेश

प्रबोधनां पलिकडे ते
तोकडे सुशांतीसंदेश
संहार करे सर्वांचां
विनाशकपूर्ण आवेश

निष्पाप शांत जनांचा
पातकांत हो समावेश
कंठ शोष ना परितोष
बहिरे ना ऐके उपदेश

आत्मघातकीशहाण्या
का ना जाणवतेक्लेष
मदोन्मत्त अणू संहारी
ठेवाल का अवनीशेष

तरतूद नसे अन्नासाठी
युध्दास्तव फंड विशेष
नव्या पिढीला द्यायला
हे ऐतिहासिकअवशेष

रे प्रगतआदिमानवांनो
भले करावे कायक्लेष
कळणार नाही होणार
माणूसकीचाचंचूप्रवेश

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# युद्धाची धग सर्वसामान्यांच्या स्वयंपाकगृहात !

**अमेरिका आणि इराण या देशांनी इराणवर केलेल्या हल्लयाला बारा दिवस उलटले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ जगाला बसणार असे मी माझ्या 'आखातातील युद्धाची जगाला झळ' या लेखात लिहिले होते.**



या युद्धाची झळ जगाला जशी बसतेय तशीच भारतालाही बसत आहे आणि युद्धाच्या या धगीत देशातील सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट होत आहे. या युद्धाची धग आता भारतीयांच्या स्वयंपाक घरांमध्येही बसू लागली आहे. इराण अमेरिका युद्धामुळे देशात गॅस तुटवडा निर्माण झाला असल्याने गॅस वितरक कंपन्यांच्या कार्यालयांपुढे नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्वयंपाकाचा गॅस ही जीवनावश्यक गरज आहे. जर हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर स्वयंपाकाला गॅस मिळणार नाही अशी भीती सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरली झाली असल्याने जो तो गॅस मिळवण्याचा प्रयत्न करत आहे त्यासाठी तासंतास रांगेत उभे राहून गॅस पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे.

सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करीत असले तरी टीव्ही वरील बातम्या पाहून सर्वसामान्यांच्या चिंतेत भरच पडत आहे. त्यात सरकारने गॅसच्या दरात ६० रुपये इतकी घसघशीत दरवाढ केल्याने भविष्यात गॅसचे दर आणखी वाढेल अशीही भीती निर्माण झाली आहे. सरकारने घरगुती गॅसला प्राधान्य देण्यासाठी व्यावसायिक सिलेंडरचे बुकिंग थांबवले आणि एकंदर बुकिंगची मुदत २५ ते ३० दिवसांवर नेण्यात आली त्यामुळे नागरिकांच्या घबराटीत भरच पडली आणि सगळीकडून एकाच वेळी नोंदणीचे सत्र सुरू झाले.

एकाच वेळी सगळीकडून नोंदणी होऊ लागल्याने नोंदणीत अडचणी येऊ लागल्या त्यामुळे नागरिक आणखी हवालदिल झाले. सर्वसामान्य नागरिक घरगुती गॅस मिळत नसल्याने हवालदिल झाले आहेत तर व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सरकारने बंद केला असल्याने हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेलला टाळे लावण्याची वेळ आली आहे. हॉटेल बंद झाल्यास त्यावर उपजीविका करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. घरगुती गॅस प्रमाणेच सिनजी गॅसचाही तुटवडा जाणवू लागल्याने सीएनजी पंपावर रिक्षा आणि वाहनांच्या देशखील रांगा पहायला मिळत आहे. गॅस तुटवड्यामुळे काही कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे.

एकूणच या युद्धाने देशातील नागरिक हैराण झाले आहेत. अर्थात हे होणारच होते याची पूर्व कल्पना सर्वांनाच होती. अमेरिका आणि अमेरिकेचे मित्र राष्ट्र असलेल्या देशांचे नाक दाबण्यासाठी इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली त्यामुळे त्यामार्गे भारतात येणारे इंधन पुरवठा थांबला. देशाच्या गरजेपैकी ६० टक्के एलपीजी गॅस आपण आयात करतो आणि त्यातील ८० टक्के एलपीजी हा आखाती देशातून हॉर्मुझमार्गे भारतात येतो. तो मार्ग बंद झाल्याने देशातील ३० टक्के गॅस पुरवठा बाधित झाला आहे. हे होणार होते याची कल्पना सरकारलाही होती मात्र सरकारने राखीव साठा किंवा पुरेशी पर्यायी व्यवस्था न केल्याचेच हे परिणाम आहेत. हे युद्ध कधी थांबेल हे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. हे युद्ध आणखी काही दिवस चालले तर यापेक्षा भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते म्हणून सरकारने पर्यायी व्यवस्था आणि सुरळीत पुरवठा अशा दोन्ही आघाड्यांवर युद्धपातळीवर पावले उचलण्याची गरज आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# यंदा अल निनोचे सावट पाऊस कमी होणार ?



यंदा अल निनो चे सावट आहे . त्यामुळे पाऊस काळ कमी होण्याची शक्यता आहे. जागतिक हवामान तज्ञानी ही शक्यता वर्तविली आहे. गेली सुमारे ३-४ वर्षे पाऊस सर्वसाधारणपणे भरपूर झाला. यंदा दुष्काळाचे सावट असल्यामुळे पाणी जपून वापर करणे आवश्यक आहे. शेतीत सुहा सरकारने मार्गदर्शन करणे जरुरी आहे. आज तरी महाराष्ट्रातील सर्वच विभागातील धरणातील साठा समाधानकारक आहे. पाणी अत्यंत काटकसरीने वापरने जरुरीचे आहे.

मोटारी किंवा इतर वाहने दररोज न धुता पाणी वाचवावे. तसेच घरगुती वापर करताना पाणी जपून वापरावे. अनेक वेळा पाणी वाहत असते त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत. सरकार आपल्या परीने लक्ष देईल पण आपणही यात पाणी वाचविणे अत्यंत जरूर आहे. आता उन्हाळाही कडक होऊ लागला आहे. साहजिकच त्याचा परिणाम धरणातील पाणीसाठा कमी होण्यात होऊ लागला आहे. पाणी म्हणजे जीवन त्याचा वापर अतिशय काटकसरीने करा.

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये 'भारतीय पारंपारिक खेळ' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१२, पाटण :** कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे 'भारतीय पारंपरिक खेळ आणि शारीरिक शिक्षणातील मनोरंजक उपक्रम' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि श्री. रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स (मल्टी-स्टेट) तसेच वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ आणि १४ मार्च २०२६ रोजी हे चर्चासत्र पार पडणार आहे.

शुक्रवार, १३ मार्च रोजी सकाळी १०:०० वाजता टेनिस व व्हॉलीबॉल खेळाचे जनक मा. प्राचार्य डॉ. व्यंकटेश वांगवाड यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण असतील. यावेळी संस्थेचे जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख आणि संचालक याज्ञसेन पाटणकर यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या चर्चासत्रास बीजभाषक म्हणून प्रो डॉ सिंकू कुमार सिंग नांदेड,तर तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ सॅम ब्रिगाझा गोवा डॉ महेंद्र सावंत केरळ, डॉ मितेश कुमार वाघ गुजरात, डॉ आनंद श्रीनिवासन कृष्णा विद्यापीठ कराड, डॉ महेंद्र कदम पाटील हे उपस्थित राहणार आहेत

शनिवार, १४ मार्च रोजी दुपारी ३:३० वाजता चर्चासत्राचा समारोप होईल. याप्रसंगी ज्येष्ठ शारीरिक शिक्षण तज्ञ प्रा. बी. के. घाटगे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे असतील.

या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. सौ. हेमलता काटे, संयोजक सचिव प्रा. डॉ. दीपक पाटील-डांगे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशाकीयक सेवकवर्ग व शारीरिक शिक्षण विभाग परिश्रम घेत आहे. या राष्ट्रीय चर्चासत्रात शारीरिक शिक्षणातील बदलत्या प्रवाहांवर आणि पारंपारिक खेळांच्या महत्त्वावर सखोल चर्चा होणार आहे. विविध राज्यातील शारीरिक शिक्षण तज्ञ प्राध्यापक यामध्ये सहभागी होणार आहेत.

## कर्जत पंचायत समितीवर परिवर्तन विकास आघाडीचा झेंडा



**अक्षराज : स्वप्निल देशमुख**

**दि.१२, कर्जत (रायगड) :** मागील महिन्यात पार पडलेल्या जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती यामध्ये परिवर्तन विकास आघाडीला घवघवीत यश प्राप्त झाले.

कर्जत तालुक्यामध्ये एक वेगळीच आघाडी झाल्याचे पाहायला मिळाले. राष्ट्रवादी अजित पवार गट व उद्धव ठाकरे शिवसेना अशी युती या तालुक्यांमध्ये झाली होती. या युतीसाठी रायगड जिल्हा राष्ट्रवादी अध्यक्ष सुधाकर भाऊ घारे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख नितीन दादा सावंत यांनी विशेष प्रयत्न केले. ही युती कर्जत नगरपालिका पासून झाली यामध्ये नगराध्यक्ष म्हणून राष्ट्रवादीच्या पुष्पाताई दगडे यांची भरघोस मतांनी निवड झाली. तसेच पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे १२ पैकी दहा सदस्य निवडून आले तर जिल्हा परिषद मध्ये तालुक्यात या युतीने मोठी मुसंडी मारल्याचे पाहायला मिळाले. कर्जत तालुक्यामध्ये असलेल्या सहा जिल्हा परिषदेमध्ये सहापैकी सहा जागा परिवर्तन विकास आघाडीने फार मोठ्या फरकाने जिंकल्या. ही युती झाल्यामुळे दोन्ही पक्षांना तालुक्यामध्ये चांगले यश मिळाले. तसेच पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादीच्या नमिता सुधाकर घारे सभापती म्हणून बिनविरोध निवडून आल्या. तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या चित्रा जगदीश ठाकरे ह्या उपसभापती म्हणून बिनविरोध निवडून आल्या. ही निवड झाल्यावर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. तसेच सभापती व उपसभापती त्यांना शुभेच्छा देण्यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष नामदार सुनीलजी तटकरे साहेब हे सुद्धा उपस्थित होते.

## नागपूर खंडपिठाचा महत्वपूर्ण निर्णय ! एक किमीचे बंधन लादणारे आरटीई नियम स्थगित



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** महाराष्ट्र शासनाने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयाद्वारे आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी एक नवीन अट घातली. या अटीनुसार विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरातील शाळाच निवडता येईल व १० शाळांची निवड करता येईल अशी सक्ती करण्यात आली. या मनमानी आणि अन्यायकारक अटीला आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. ॲड. बोधी रामटेके आणि ॲड. दीपक चटप यांच्या युक्तिवादानंतर ५ मार्च रोजी शासनाला उत्तर दखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली. राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना व पालकांना दिलासा मिळाला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गम भागातील शंकर आत्राम यांच्या घरापासून १ किलोमीटरच्या आत एकही पात्र शाळा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या पाल्यासाठी अर्ज करता आला नाही. त्यांची बाजू मांडत ॲड. बोधी रामटेके आणि ॲड. दीपक चटप यांनी १ किलोमीटरची सक्ती ही आरटीई कायद्याच्या उद्देशालाच बाधा आणणारी असून ती संविधानातील शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराच्या विरोधात आहे असा युक्तिवाद केला होता. समान विषयाची याचिका सामाजिक कार्यकर्ते आशिष फुलझेले, अनिकेत कुत्तरमारे यांच्या माध्यमातून ज्येष्ठ अधिवक्ता जयना कोठारी, ॲड. दीपांकर कांबळे यांनी केली होती. आज दोन्ही प्रकरणातील सुनावणीनंतर, या विषयाची गंभीर दखल घेत नागपूर खंडपिठाने एक किमीचे बंधन लादणाऱ्या आरटीई नियमांना स्थगिती दिलेली आहे. ज्येष्ठ अधिवक्ता जयना कोठारी, अधिवक्ता बोधी रामटेके व अधिवक्ता दीपक चटप यांनी न्यायालयात युक्तिवाद मांडला. शिक्षण हक्क कायद्यात २५ टक्के जागा वंचित घटकांसाठी आरक्षित करण्याचा मूलभूत उद्देश हा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. सदर कायद्यातील १२ (१) (सी) नुसार किलोमीटर संदर्भातली कुठलीही अट नाही. एक किमीची अट मनमानी, अवैध आणि संविधानविरोधी आहे. १ किलोमीटरची सक्ती लादल्याने ग्रामीण व शहरी दोन्ही भागांतील मुलांना या योजनेचा लाभ घेणे अशक्य होत होता. सदर न्यायनिर्णयामुळे महाराष्ट्रातील वंचित घटकांतील हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा ठरलेला आहे.

## विराज सासवडेची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी विधानभवनात भेट !

# जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्याचे स्वप्न साकार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड जिद्द आणि गुणवत्ता दडलेली असते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा धोत्रे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीचा विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने दिला आहे. आपल्या सुंदर हस्ताक्षराच्या बळावर जिल्हा स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत त्याने उल्लेखनीय यश संपादन केले असून, या यशामुळे त्याचे एक मोठे स्वप्नही साकार झाले. विराजची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी विधानभवनात भेट घडून आली.

विराज सासवडे याने यापूर्वीही हस्ताक्षर स्पर्धेत जिल्हा स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले होते. त्यावेळी पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी विराजचे सुंदर हस्ताक्षर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत पोहोचवले होते. विराजच्या हस्ताक्षराचे कौतुक करत अजित पवार यांनी विराज व त्याचे शिक्षक सचिन ठाणगे यांना भेटीसाठी आमंत्रण दिले होते. मात्र दुर्दैवाने ही भेट होण्यापूर्वीच अजित पवार यांचे निधन झाल्याने ती भेट अपूर्ण राहिली होती.

दरम्यान, यावर्षी पुन्हा एकदा जिल्हा स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विराजने आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यानंतर आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी विधानभवनात विराजची भेट घडवून आणण्यात आली.

यावेळी सुनेत्रा पवार यांनी विराजच्या सुंदर हस्ताक्षराचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण विराज सासवडेने घालून दिल्याचे त्यांनी सांगितले.

विराजच्या या यशामुळे धोत्रे खुर्द गावासह जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भेटीप्रसंगी शिक्षक सचिन ठाणगे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब नाईकवाडी, पंढरीनाथ तागड, पालक सुभाष सासवडे, जयदीप ठाणगे, नाथा कोळेकर योगेश वाव्हळ, नामदेव कोळेकर आदी उपस्थित होते.

## मंत्रालयात नगराध्यक्षांची महत्त्वाची बैठक ; रस्त्याचे काम ३० एप्रिलपर्यंत पूर्ण होणार



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१२, महाबळेश्वर :** महाबळेश्वर आणि पाचगणी या पर्यटनस्थळांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यांची दुरवस्था आणि प्रलंबित कामांबाबत मंत्रालयात एक महत्त्वाची बैठक संपन्न झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सुरूर-पोलादपूर रस्त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

**महत्त्वाचे निर्णय आणि आश्वासने :**

सुरूर ते वाई रस्ता: या मार्गावरील प्रलंबित काम ३० एप्रिल २०२६ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याचे आश्वासन संबंधित ठेकेदाराने दोन्ही मंत्र्यांना दिले आहे. यामुळे पर्यटकांचा आणि स्थानिक नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे.

**महाबळेश्वर-पाचगणी रस्ता :**

महाबळेश्वर आणि पाचगणी शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत नगराध्यक्षांनी मांडलेल्या व्यथेची दखल घेत, या मार्गावरील सर्व पॅचवर्क (खड्डे भरण्याचे काम) तातडीने पूर्ण करून रस्ता वाहतुकीस योग्य करण्याचे निर्देश देण्यात आले. ठेकेदाराने हे काम तातडीने पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

**लोकप्रतिनिधींनी मांडली बाजू :**

बैठकी दरम्यान महाबळेश्वरचे नगराध्यक्ष सुनील शिंदे आणि पाचगणीचे नगराध्यक्ष दिलीप बगाडे यांनी रस्त्यांच्या खराब स्थितीमुळे पर्यटनावर होणाऱ्या परिणामांकडे लक्ष वेधले. रस्ते तातडीने दुरुस्त न झाल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, ही बाब त्यांनी प्रकर्षाने मांडली. या बैठकीला महाबळेश्वर चे नगरसेवक ॲड संजय जंगम, रोहित ढेबे व पाचगणी नगरपरिषदेचे नगरसेवक, दोन्ही शहरांचे मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित प्रकल्पाचे ठेकेदार उपस्थित होते.

## कल्याण–मुरबाड रेल्वे प्रकल्पाला मिळणार गती; संसदेत रेल्वे मंत्र्यांचे आश्वासन

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१२, शहापूर (ठाणे) :** कल्याण–मुरबाड रेल्वे प्रकल्पाला अखेर गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा) यांनी बुधवारी दिल्लीतील संसदेच्या अधिवेशनात हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारने या प्रकल्पाबाबत सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर काम सुरू करावे, तसेच यासाठी संयुक्त समन्वय समिती स्थापन करावी अशी मागणी केली.



**● यावेळी प्रतिक्रिया देताना खासदार सुरेश म्हात्रे म्हणाले की,**

कल्याण–मुरबाड रेल्वे प्रकल्पासाठी मी सातत्याने संसदेत आवाज उठवत आलो आहे. रेल्वेमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे हा महत्त्वाचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल आणि या भागाच्या विकासाला मोठी चालना मिळेल. कल्याण–मुरबाड रेल्वे मार्ग सुरू झाल्यास मुरबाड व परिसरातील हजारो नागरिकांना प्रवासासाठी मोठा दिलासा मिळणार असून औद्योगिक आणि आर्थिक विकासालाही नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या मागणीला उत्तर देताना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सभागृहात स्पष्ट केले की, कल्याण–मुरबाड रेल्वे प्रकल्पाबाबत केंद्र आणि राज्य सरकार दोन्हीही सकारात्मक आहेत. सुरुवातीला या प्रकल्पासाठी भूमी अधिग्रहणाकरिता सुमारे ८३६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र परिसराचा वेगाने होत असलेला विकास लक्षात घेता आता भूमी अधिग्रहणाचा खर्च सुमारे १,४०० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

याबाबत राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी देखील चर्चा झाल्याचे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले. लवकरच भूमी अधिग्रहणाचा प्रश्न मार्गी लावून प्रकल्पाच्या कामाला गती दिली जाईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.

दरम्यान, भिवंडी तालुक्यातील बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे बाधित झालेल्या भरोडी गावासाठी अंडरपास मंजूर केल्याबद्दल खासदार सुरेश म्हात्रे यांनी रेल्वेमंत्र्यांचे आभारही मानले.

## नारी शक्तीला वंदन : फुटाणा (मो.) येथे महिला दिनाचा प्रेरणादायी उत्सव



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** पोंभूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, फुटाणा (मो.) येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनात्मक खेळ तसेच विद्यार्थ्यांचे आकर्षक सांस्कृतिक सादरीकरण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमातून महिला सन्मान व महिला सक्षमीकरणाचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रा. पं. फुटाणा च्या सरपंच संगीता तेलसे या होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन उपसरपंच नैलेश चिंचोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून वनिता पाल, पोलीस पाटील अशोक फलके, ग्रामपंचायत सदस्य संजय पुडके, चंद्रहास खोब्रागडे, तृप्ती पाल, रोहिणी तेलसे, पौर्णिमा चांदेकर तसेच आशा सुपरवायझर सरोज खोब्रागडे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात गावातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत व इतर सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. तसेच महिलांसाठी आयोजित मनोरंजनात्मक खेळांमुळे कार्यक्रमात आनंददायी वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी मान्यवरांनी महिलांचे समाजातील योगदान, शिक्षणाचे महत्त्व तसेच महिला सक्षमीकरणाविषयी प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जितेंद्र बट्टे, उपाध्यक्ष प्रतिमा महामंडरे तसेच सदस्य भारत चौधरी, मदन चंदावार, संजोग खोब्रागडे, जोशीला नागापुरे, शालूताई पुडके, जितेंद्र नागापुरे यांनी सहकार्य केले.

मुख्याध्यापक श्रीकांत लोनबले व सर्व शिक्षकवृंद विवेकानंद उराडे, कु. वैशाली वडेट्टीवार, सिद्धार्थ खोब्रागडे, कु.स्नेहा रामटेके यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

या महिला दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने गावातील महिलांनी शाळेच्या विकासासाठी पुढाकार घेत भरघोस निधी उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले. अंगणवाडी सेविका, आशाताई, गावातील महिला बचत गट तसेच समस्त ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम उत्साहात व आनंदात पार पडला.

महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि शाळेबद्दलच्या जिव्हाळ्यामुळे हा महिला दिन सोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न ठरता गावातील महिला सशक्तीकरणाचा प्रेरणादायी उत्सव ठरला.

# काला दहीहंडी फोडून नाथषष्ठी महोत्सवाची सांगता !

## टाळ-मृदंगाच्या गजरात 'भानुदास एकनाथ' चा जयजयकार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पैठण (छ.संभाजीनगर) :**

**खडकी सोडियेला मोटा ।**
**आजचा दहिकाला गोमटा ।**
**घ्या रे घ्या रे दहिभात ।**
**आम्हा देतो पंढरीनाथ ।**

या अभंगांच्या सुरेल गजरात कालाष्ठमीच्या मुहूर्तावर बुधवारी (दि.११) रोजी सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी नाथमंदिरात काला दहीहंडी फोडून संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी महोत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. या तीन दिवसीय नाथषष्ठी यात्रोत्सवाला लाखो वारकरी व भाविकांनी हजेरी लावून नाथसमाधीचे दर्शन घेतले.





नाथसंस्थानची काला दहीहंडी आमदार तथा नाथमंदिर संस्थानचे अध्यक्ष विलास भुमरे, किर्तनकार हभप ज्ञानेश्वर महाराज कदम आळंदीकर यांच्या हस्ते फोडण्यात आली. तर नाथसमाधी मंदिरातील दहीहंडी नाथवंशज ह.भ.प. रावसाहेबबुवा गोसावी यांच्या हस्ते फोडण्यात आली. यावेळी नाथवंशज व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तीन दिवसापासून सुरु असलेल्या या सोहळ्याने नाथषष्ठी महोत्सवाची सांगता झाली.

नाथसंस्थानच्या वतीने नाथ समाधी मंदिरासमोरील डोममध्ये आमदार विलास भुमरे यांच्या उपस्थितीत ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम यांचे काल्याचे किर्तन झाले. काल्याच्या कीर्तनानंतर आमदार विलास भुमरे, ज्ञानेश्वर महाराज कदम यांच्या हस्ते काला दहीहंडी फोडण्यात आली. या सोहळ्यासाठी हजारो वारकरी व भाविकांनी मोठी गर्दी केली होती. भक्तांनी आणलेला काल्याचा प्रसाद मोठ्या उत्साहात वाटप करण्यात आला. काला प्रसाद घेण्यासाठी भाविकांनी मोठी धावपळ केली.

यावेळी राज्य दूध संघाचे संचालक नंदलाल काळे, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, नगराध्यक्ष विद्या कावसानकर, उपनगराध्यक्ष तुषार पाटील, मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, नगरसेवक ईश्वर दगडे, महेश मुंदडा, भुषण कावसानकर, जितु परदेशी, शेखर शिंदे, सुनील हिंगे, संजय सोनारे, दिपक मोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील, पोलिस निरीक्षक महादेव गोमारे, शिवाजी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र बोरकर, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, पवन लोहीया, प्रशांत जगदाळे, आदींसह मान्यवर उपस्थित होते. परंपरेनुसार गावातील नाथांच्या वाड्यातून नाथवंशजांची मानाची दिंडी सायंकाळी वाळवंट मार्गाने बाहेरील नाथसमाधी मंदिरात दाखल झाली. दिंडी मंदिरात येताच वारकरी व भाविकांनी 'भानुदास एकनाथ'चा गजर करत टाळ-मृदंगाच्या गजरात सात पावली खेळून भक्तीभाव व्यक्त केला.

महोत्सवात सहभागी झालेल्या शेकडो दिंड्या व हजारो वारकऱ्यांनी कालाष्ठमीच्या मुहूर्तावर सकाळपासून आपल्या फडावर किर्तन करीत काला दहीहंडी फोडून काल्याचा प्रसाद घेतला. आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा रामराम घ्यावा असे अभंग गात वारकऱ्यांनी पैठण देव नगरीचा भावपूर्ण निरोप घेतला.

यंदा नाथषष्ठी निमित्त राज्यभरातून जवळपास ७०० पेक्षा अधिक वारकरी दिंड्या पैठण नगरीत दाखल झाल्या होत्या. यात प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ, खानदेश तसेच पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या दिंड्यांमुळे संपूर्ण पैठण वैष्णवांच्या गजराने दुमदुमून गेली. या दिंड्यांमधील अंदाजे सहा ते सात लाखांहून अधिक वारकऱ्यांनी नाथ समाधी मंदिरात जाऊन नाथांच्या चरणी माथा टेकला.

### न.प. ची चोख व्यवस्था व पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

नाथषष्ठी यात्रोत्सव सुरळीत पार पडावा वारकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी नगर परिषद प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले होते. यात्रा काळात वारकऱ्यांना मोबाईल शौचालय, स्वच्छ पिण्याचे पाणी फडावर उपलब्ध करुन देत शहरातील मुख्य रस्त्यावर धुळ उडू नये यासाठी झाडलोट करीत पाणी शिंपडून स्वच्छता अभियान मोहीम सुरु ठेवली. तर पोलिस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. पोलिस अधीक्षक विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील, पो. नि. महादेव गोमारे, उपनिरीक्षक ऋषीकेश तळेकर, संभाजी खाडे, रज्जाक शेख, पोहेका रावसाहेब आव्हाड, नरेंद्र अंधारे, कल्याण ढाकणे, भाऊसाहेब तांबे, राजेश आटोळे, यांनी वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष बंदोबस्त तैनात केला होता.

# टाकळी ढोकेश्वर येथे बनाई देवी यात्रेची जय्यत तयारी

## यात्रा कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ यांची माहिती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रा उत्सव यावर्षी मोठ्या धुमधडाक्यात साजरा होणार असल्याची माहिती यात्रा कमि टीचे अध्यक्ष संपतराव तराळ यांनी दिली आहे.

टाकळी ढोकेश्वर परिसरातील सर्वात मोठा यात्रा महोत्सव असल्याम ुळे गावातील ग्रामस्थ व परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या ठिकाणी भाविकांची व पाहुणेरावळ्यांची यात्रेनिमित्त नेहमीच गर्दी असते. शनिवार दि.२१ मार्च २०२६ पासून या यात्रा महोत्सवाला सुरुवात होते तर मंगळवार दि. २४ मार्च २०२६ रोजी मुक्ताई देवीच्या यात्रेने या यात्रा महोत्सवाची सांगता होते.

गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दुसऱ्या दिवशी शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी फकीर शहावली बाबांचा संदल कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात दारूगोळ्याची आतषबाजी करत यात्रेची सुरुवात होते. रविवार दि. २१ मार्च २०२६ रोजी बनाईदेवी यात्रेनिमित्त सकाळी ८.३० वा काठी मिरवणूक रात्री ७.३० वा. भव्य छबिना मिरवणूक आतिषबाजी आणि रात्री १० वा. नाम वंत तमाशा कलावंत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला बनसोडे सह नितीनकुमार बनसोडे करवडीकर या मराठमोळ्या तमाशा कार्यक्रमाचे आयोजन केले असून सोमवार दि. २३ मार्च २०२६ रोजी मळगंगा देवीची सकाळी ८.३० वा. काठी मिरवणूक दुपारी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा, भरविण्यात येणार आहे. रात्री ७.३० वा. भव्य छबिना पालखी मिरवणूक, रात्री १० वा. नामवंत लावणी कलाकार शबनम पुणेकर यांचा फुलवंती ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर मंगळवार,दि.२४ मार्च २०२६ रोजी मुक्ताई देवीची सकाळी ८ वा. काठी मिरवणूक मुक्ताई देवीच्या यात्रेनिमित्त सकाळी ८ ते सायंकाळी



६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

रात्री ८ वा. भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वा. अमर पुणेकर प्रस्तुत नटखट सुंदरा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रमाने या ४ दिवसीय यात्रेची सांगता होते. या यात्राउत्सवचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बनाईदेवी यात्रा उत्सव कमेटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, विवेक (सोन्या) धुमाळ, प्रशांत झावरे, अंकुश पायम ोडे, मळिभाऊ रांधवण, विक्रम झावरे, बांडे मामा,विकास आल्हाट व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खा.श्रीकांत शिंदे यांच्या निधीतून निळजे तलाव सुशोभीकरणाला गती

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, कल्याण (ठाणे) :** कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या खासदार निधीतून कल्याण ग्रामीण भागातील निळजे गावात सुरू असलेल्या तलाव सुशोभीकरणाच्या कामांची कल्याण ग्राम ीणचे आमदार राजेश मोरे यांनी नुकतीच प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी तलावात जाणारे सांडपाणी रोखण्यासाठी नवीन गटार व्यवस्था उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. गावाच्या विकासासाठी सुरू असलेल्या या महत्त्वपूर्ण कामाचा आढावा घेण्यासाठी आमदार राजेश मोरे यांनी अधिकाऱ्यांसह निळजे गावाला भेट दिली. या पाहणी दौऱ्यात तलाव परिसराची सद्यस्थिती, सुरू असलेली कामे आणि पुढील नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पाहणीदरम्यान गावातील गटाराचे पाणी थेट तलावात मिसळत असल्याचे निर्दशनास आले. तलावाचे सुशोभीकरण करताना त्याची स्वच्छता राखणे अत्यंत गरजेचे असल्याने, याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची गरज आमदार मोरे यांनी व्यक्त केली. गावातील सांडपाणी व्यवस्थित वाहून जावे आणि तलाव स्वच्छ राहावा, यासाठी तातडीने नवीन गटार बांधण्याचा निर्णय यावेळी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चे त घेण्यात आला. तसेच, निळजे रेल्वे लाईन परिसरातून एका बाजूचे गटाराचे पाणी दुसऱ्या बाजूला सुरळीतपणे वाहून जाण्यासाठी आवश्यक व्यवस्था कशी करता येईल, याबाबत स्थानिक गावकऱ्यांशी आणि अधिकाऱ्यांशी सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. या पाहणीसाठी डीएफसी विभागाचे अधिकारीही उपस्थित होते. त्यांनी सांडपाणी व्यवस्थापनाच्या तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले.

या पाहणी दौऱ्यात आमदार राजेश मोरे यांच्यासोबत अधिकाऱ्यांसह गजानन पाटील, सुभाष पाटील, लालचंद भोईर, मुकुंद पाटील, अनिल गजानन पाटील, महेश नकुल पाटील, शराजेश पाटील, प्रकाश पाटील आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नव्या सांडपाणी व्यवस्थेमुळे निळजे तलावाचे खऱ्या अर्थाने संवर्धन होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# थोडक्यात

## वंदे मातरम मातृभूमी प्रेमाचे प्रतीक : प्राचार्य मतकर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वंदे मातरम चलचित्र रथाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्म णराव मतकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वंदे मातरम हे मातृभूमीवरील प्रेम तसेच देशभक्तीचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य आंदोलनात या गीताने सामान्य भारतीयांमध्ये जाज्वल्य देशभक्तीची ज्योत पेटविण्याचे कार्य केले. अनेक स्वातंत्र्यसैनिक या गीताने प्रेरित होऊन देशकार्य करत होते.



वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना या गीताचे तसेच स्वातंत्र्य आंदोलनाचे महत्त्व समजावे यासाठी चलचित्र रथ फिरविण्यात येत आहे. हा विद्यापीठाचा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जिजाभाऊ घुले यांनी केले. प्रास्ताविक प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी केले, तर आभार प्रा. नामदेव वाल्हेकर यांनी मानले. वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विरेंद्र धनशेट्टी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कार्यालयीन प्रमुख सावकार काकडे, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालम येथील पीएमश्री जि.प. कन्या शाळेत अंगणवाडीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु...

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१२, पालम (परभणी) :** पालम शहरातील पालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळा येथे नवीन अंगणवाडी वर्ग सुरू करण्यात आला असून, पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन मुख्याध्यापक सतीश कांबळे यांनी केले आहे. शहरातील कोणताही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने जिल्हा परिषद प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. या उपक्रमांतर्गत बालवाडी आणि इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.



या शाळेत अंगणवाडी, बालवाडी ३ ते ६ वयोगटातील मुला, मुलींसाठी प्रवेश खुले आहेत. इयत्ता पहिलीसाठी ६ वर्षे पूर्ण असलेल्या मुलांच्या प्रवेशासाठी पालकांनी शाळेत संपर्क साधावा, प्रवेशासाठी

येतांना पालकांनी मुलांचे आधार कार्ड सोबत आणने अनिवार्य आहे.

मुलांना शाळेची गोडी लागावी आणि बालपणापासूनच शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना आणता यावे, यासाठी पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

आपल्या पाल्याच्या शैक्षणिक भविष्याची पायाभरणी दर्जेदार शाळेतून व्हावी, यासाठी शहरातील पालकांनी आपल्या ३ ते ६ वयोगटातील मुलांना अंगणवाडीत दाखल करावे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

**– सतीश कांबळे, मुख्याध्यापक, पीएमश्री जि.प. कन्या शाळा,पालम.**

## गों.वि.आयोजित युवा महोत्सव-२०२५-२६ मध्ये ग्रामगीता महाविद्यालयाची भरारी...

**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.१२, चिमूर :** विद्यार्थी विकास विभाग,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली दिनांक ५,६,व ७ मार्च-२०२६ रोजी आयोजित तर -महाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव भरारी-२०२५-२६ स्पर्धेमध्ये ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर ने सर्वसाधारण उपविजेता चषक पटकाविला. तसेच सर्वसाधारण विजेता कला प्रकार नाटक मध्ये सांघिक चषक पटकाविला. या युवा महोत्सवामध्ये ग्रामगीता महाविद्यालयातील एकूण २३ विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये एकांकिका, प्रहसन, पेंटिंग व शास्त्रीय ताल या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच कोलाज व मूकनाट्य या स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे लोकनृत्य, क्ले मॉडलिंग, समूहगीत, वेस्टर्न ग्रुप व वेस्टर्न सोलो साँग या स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक पटकाविला. एकांकिका, प्रहसन व मूकनाट्य यामध्ये गौरी चंदनखेडे, सविता नन्नावरे, पुष्पक तिवाडे, संदीप जीवतोडे ,वैभव बारेकर, निखिल झाडे, सुमित नागोसे, मुकेश भिमटे, चांदणी शेंद्रे, रूपाली सोनटक्के व लावण्या धोटे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्याचप्रमाणे शास्त्रीय तालवाद्य या स्पर्धेमध्ये गुरुदेव सूर्यवंशी याने प्रथम क्रमांक पटकाविला. व पेंटिंग या स्पर्धेमध्ये धीरज लोथे याने प्रथम तर क्ले मॉडलिंग स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला. कोलाज या स्पर्धेमध्ये कु. प्रणाली चानुरकर हिने द्वितीय क्रमांक पटकाविला तर वेस्टर्न सोलो साँग स्पर्धेमध्ये कु.समीक्षा भरडे हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

लोक नृत्य स्पर्धेमध्ये कु. सविता नन्नावरे, कु. समीक्षा नन्नावरे, कु. गौरी चंदनखेडे,कु. आश्लेषा चन्ने, कु. चांदणी शेंद्रे, कु. वैष्णवी सातपुते ,कु.संगीता चौधरी, कु. प्राजक्ता लाडसे, कु. प्राची निखारे आणि कु. रूपाली सोनटक्के या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच समूहगीत स्पर्धेमध्ये गुरुदेव सूर्यवंशी, मुकेश भिमटे, , कु. प्राजक्ता लाडसे, कु. प्राची निखारे, कु. आश्लेषा चन्नै व चांदणी शेंद्रे या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. डॉ. प्रशांत बोकारे, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व डॉ. प्रिया गेडाम, संचालक, विद्यार्थी विकास विभाग,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी विद्यार्थ्यांना चषक देऊन त्यांचे अभिनंदन केले व व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे डॉ. सुनंदा आस्वले, प्राचार्य, ग्रामगीता महाविद्यालय व प्रा. डॉ. संदीप सातव, प्रा.डॉ. हुमेश्वर आनंदे, प्रा. डॉ. निलेश ठवकर, प्रा.डॉ.वरदा खटी, प्रा. डॉ. युवराज बोधे, प्रा. डॉ. बिजनकुमार शील, प्रा. डॉ. सरताज शेख, प्रा. कु. प्रज्ञा खोब्रागडे, गौरव मेश्राम व प्रा. डॉ. सुमेध वावरे, समन्वयक, विद्यार्थी विकास विभाग व तसेच कमलेश दडमल, मनसाराम गोडमारे, निखिल भालेराव, व संजय खोब्रागडे आणि सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.